## ग्रामीण भागातील अपंगाना शेळीपालन गट करण्यासाठी अनुदान
## अटी व शर्ती व अर्जाचा नमुना

1. लाभार्थी हे किमान 40% अपंग असावा.
2. लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न र.रु.1,00,000/- पेक्षा जास्त नसावे.(तहसिलदार यांचे प्रमाणपत्र)
3. लाभार्थी हा सोलापूर जिल्ह्यातील रहिवाशी असलेबाबतचा ग्रामसेवक / ग्राविअ यांचा दाखला सादर करावा.
4. लाभार्थ्यांची निवड ग्रामसभेमध्ये झालेली असावी.
5. या किंवा तत्सम योजने अंतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थीस पुन्हा सदर योजनेचा लाभ देण्यात येऊ नये. तसेच एकाच कुटुंबात दुबार लाभ देण्यात येवू नये.
6. लाभार्थ्यांने विहित नमुन्यातील अर्ज गटविकास अधिकारी यांचेकडे सादर करावा.
7. शेळी गट खरेदी नंतर वाहतुकीचा तसेच विम्याचा संपूर्ण खर्च लाभार्थ्याने करावा.
8. या योजनेअंतर्गत वाटप करण्यात आलेल्या शेळी गटाचे लाभार्थी व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जि.प.सोलापूर यांच्या संयुक्त नावे 3 वर्षासाठी विमा उतरविण्यात यावा.
9. योजने अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या शेळ्या/बोकड मृत पावल्यास विम्याच्या रकमेतून नवीन शेळ्या/बोकड खरेदी करणे लाभार्थीयास बंधनकारक राहील.
10. या योजने अंतर्गत खरेदी करण्यात आलेले शेळी गटची विक्री करणार नाही, त्यावर उचल घेतली जाणार नाही / परस्पर विक्री करणार नाही. याबाबत र.रु.20/- च्या स्टॅम्प पेपरवर किंवा को-या कागदावर ,र.रु.20/- च्या कोर्ट फी स्टॅम्प ( तिकीट) लावुन प्रतिज्ञापत्र दिल्यानंतरच खरेदी करण्यात आलेल्या शेळी गटाचेअनुदान वाटप करण्यात येईल.
11. कुटुंबातील कोणतीही व्यक्ती शासकीय/निमशासकीय सेवेत असेल तर त्यांना लाभ देता येणार नाही.
12. ग्रामसेवक / ग्राविअ व गट विकास अधिकारी यांनी लाभार्थ्यांना यापुर्वी या योजनेचा लाभ घेतलेला नाही याची खात्री करुनच फक्त पात्र लाभार्थ्यांची यादी पाठवावी.
13. स्तंभ 3 अन्वये लाभार्थ्यांची अंतिम निवड करण्याचे अधिकार समाज कल्याण समितीस असतील.
14. लाभार्थ्याने साहित्य विकल्याचे,गहाण ठेवल्याचे अथवा विल्हेवाट लावल्याचे निदर्शनास आल्यास अनुदानाची रक्कम एकरकमी 7.40% व्याजासह वसूल करण्यात येईल.
15. सदर योजनेतंर्गत अनुदान मंजुर झाल्यानंतर उस्मानाबादी किंवा संगमनेरी या जातीच्या शेळ्या व बोकड, शेळयांच्या अधिकृत बाजारातून शेळ्या/बोकडांची खरेदी करण्यात यावी.
16. अनुदान मागणीचा परिपूर्ण प्रस्ताव लाभार्थीने पंचायत समितीत स्तरावर आवश्यक कागदपत्रासह सादर करण्याची जबाबदारी लाभार्थीची राहील व त्यानंतर वस्तु खरेदी केल्याची तपासणी केल्यानंतर मंजुर अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यावर DBT पध्दतीने बँक खात्यावर वर्ग केले जाईल.
17. या योजने अंतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थीची यादी संबंधित पशुधन विकास अधिकारी (विस्तार), कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय संस्था व संबंधीत ग्रामपंचायत यांचे स्तरावर उपलब्ध करून द्यावी. पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी तसेच कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय व संस्थांनी लाभार्थीची नोंद शेळी गटाच्या तपशीलासह स्वतंत्र नोंदवहीत घ्यावी व पाठपुरावा करावा.

जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद सोलापूर

सभापती,
समाजकल्याण समिती,
जिल्हा परिषद सोलापूर

## समाज कल्याण विभाग,जिल्हा परिषद सोलापूर
## अर्जाचा नमुना

**प्रति,**

**मा. गट विकास अधिकारी ,**
**पंचायत समिती, ------------------,**

**विषय : अपंगासाठी शेळीपालन गट खरेदी करणेसाठी अनुदान मंजुर करणे बाबत..**

**महोदय,**

सन 2020-21 या आर्थिक वर्षात समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर मार्फत जि.प.सेस फंडातून अपंगासाठी लाभार्थ्यांना शेळीपालन गट खरेदी करणेसाठी अनुदान मिळणे विषयी विनंती

मी श्री/ श्रीमती. ----------------------------------------------------राहणार (गांव / ग्रामपंचायत) -------------------- तालुका ----------------- जि.सोलापूर जात ------------------- पोटजात --------------- उत्पन्न ________ (अक्षरी रुपये ------------------------------------------------------------------)

वर नमूद केलेल्या योजनेमधुन मला स्वत:च्या कुटुंबाचे उदरनिर्वाहसाठी शेळीपालन गट खरेदी करण्यासठी अनुदान मंजुर करावे म्हणून मी आवेदन करीत आहे. योजनेच्या सर्व अटी व शर्तीची पूर्तता होत असून शेळीपालन गट यापूर्वी मी कोणत्याही शासकीय योजनेतून लाभ घेतला नाही. चुकीची अथवा खोटी माहिति दिल्याचे निदर्शनास आल्यास मला दिलेले अनुदान व्याजासह परत घेतले जाईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

अर्जदाराची सही

दिनांक :

संपूर्ण नांव : ---------------

मोबाईल क्र.

## रहिवासी दाखला

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती. ------------------------------------------------------------ हे गांव (ग्रामपंचायत) ------------------------ ता.------------------------ जि.सोलापूर येथील कायमचे रहिवाशी आहेत, अपंगासाठी शेळीपालन गट मंजूर करण्यासाठी ग्रामसभेने मान्यता दिली असून त्याचा ठराव क्र.________ दिनांक असा आहे.

ठिकाण :
दिनांक :

ग्रामसेवक/ग्राविअ
सही व शिक्का

## ग्रामसेवक/ग्राविअ , गटविकास अधिकारी यांची शिफारस

अर्जदार श्री/श्रीमती ------------------------------------------------------------ राहणार ---------------------- ता.----------------------, जि.सोलापूर यांनी अपंगासाठी शेळीपालन गट मिळण्यासाठी अर्ज केले असून योजनेच्या निकषानुसार अपंगासाठी शेळीपालन गट मिळण्यासाठी ते पात्र ठरतात. सबब अपंगासाठी शेळीपालन गट अनुदान मंजूर करण्यास पात्र आहे,अशी शिफारस करण्यात येत असून त्यांना यापूर्वी कोणत्याही योजनेतुन शेळीपालन गट लाभ देण्यात आलेला नाही.

सही
ग्रामसेवक/ग्राविअ

सही
गटविकास अधिकारी
पंचायत समिती------------

**सोबत जोडावयाची कागदपत्रे**

1) अपंगात्त्वाचे प्रमाणपत्र (प्रत)
2) ग्रामसभेचा ठराव (प्रत)
3) यापुर्वी सदर योजनेचा लाभ घेतला नसल्याबद्दलचे प्रमाणपत्र.
4) उत्पन्नाचे तहसिलदार यांचे प्रमाणपत्र ( र.रू.1,00,000/-पर्यंत)
5) राष्ट्रीयकृत बॅंकेचे आधारकार्ड सलंग्न असलेले पासबुक झेरॉक्स